# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका सुरक्षा दल</u>

## <u>महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसुदा</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुरक्षा खात्याच्या आस्थापनेवरील पीबी 2 रु.9300-34800 अधिक ग्रेड पे रु.4200 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील 'सहाय्यक सुरक्षा अधिकारी' या संवर्गातील 27 रिक्त व 16 संभाव्य रिक्त अशी एकूण 43 रिक्त पदे व 'सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण)' या संवर्गातील 04 रिक्त पदे भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून दि.27.11.2015 ते दि.18.12.2015 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता / अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता पात्र आहेत. उमेदवारांनी http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर ASO_ Recruitment **2015** या लिंकवर अर्ज करावेत. अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (वैध) E-mail ID असणे आवश्यक आहे. भरतीप्रकिया परिक्षेचे प्रवेशपत्र व इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याने भरतीप्रकियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर E-mail ID वैध राहणे आवश्यक आहे.

**<u>टिप -</u>**

- **भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.**
- **रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरतीप्रकिया अंशत: / पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.**

1. **पदाचे नाव/वर्ग - सहाय्यक सुरक्षा अधिकारी (ब वर्ग)**

**<u>एकूण पदे - 43</u>**

सन 2003 मधील सहाय्यक सुरक्षा अधिकारी पदाच्या भरती प्रक्रियेतील अपात्र उमेदवारांच्या बाबत उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या अपिलाबाबत (रिट पिटीशन नं.1771 of 2014) प्राप्त होणाऱ्या निर्णयाच्या अनुषंगाने रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकेल.

(PB2 – रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4200)

| **पदाचे नाव व वर्ग** | **अजा** | **अज** | **विजा (अ)** | **भज (ब)** | **भज (क)** | **भज (ड)** | **विमाप्र** | **इमाव** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक सुरक्षा अधिकारी (ब वर्ग) | **4** | **4** | **1** | -- | **1** | **1** | -- | **11** | **22** | **21** | **43** |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण सामाजिक आरक्षण | 3 | 3 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 6 | 14 | 14 | 28 |
| महिला (30%) | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 7 | 6 | 13 |
| खेळाडू (5%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 |
| एकूण | 4 | 4 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 11 | 22 | 21 | 43 |

शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग आणि वि.मा.प्र.(अ) या प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणास न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने याबाबत न्यायालयाच्या प्राप्त होणाऱ्या अंतिम आदेशासापेक्ष आणि त्याअनुषंगाने शासनाच्या प्राप्त होणाऱ्या निदेशासापेक्ष सदर प्रवर्गासाठी आरक्षित करावयाची पदे खुल्या गटात समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

1) पदाचे नावः <u>सहाय्यक सुरक्षा अधिकारी</u>

**(अ) <u>शैक्षणिक व इतर आवश्यक अर्हताः</u>**

(i) उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला/विज्ञान/वाणिज्य/कायदा किंवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी किमान **50%** गुणांसह धारण केलेली असावी.

(ii) उमेदवाराने राष्ट्रीय छात्रसेनेचे किमान 'बी' किंवा 'सी' प्रमाणपत्र धारण केलेले असावे. अथवा मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा दलात सुरक्षा रक्षक/मुख्य सुरक्षा रक्षक/सुरक्षा जमादार इत्यादि पदावर काम केल्याचा 15 वर्षांचा अनुभव असावा.

(iii) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सीसीसी किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्यांनी शासनाने विहीत केलेली एम.एस.सी.आय.टी.ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 02 वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

(iv) **<u>“उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणांची (उच्च किंवा निम्नस्तर) प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्च किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.”</u>**

(v) मिलीटरी, नेव्ही, हवाई दल, बी.ए.आर.सी. इत्यादि शासकीय सेवेमधील सुरक्षा कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(vi) मैदानी खेळात व खेळात निपुण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(vii) 5% पदे महापालिकेतील सुरक्षा विभागातील निम्नसंवर्गातील कर्मचाऱ्यांकरिता राखून ठेवण्यात येतील. परंतू सदर पदांवर अंतर्गत उमेदवार उपलब्ध न झाल्यास सरळसेवेने भरण्यात येतील.

(viii) उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना प्रतिमासी विहित दराने विद्यावेतनावर चार महिन्यांचे प्रशिक्षण (तीन महिन्यांचे निवासी व एक महिन्याचे अनिवासी प्रशिक्षण) घ्यावे लागेल.

**(ब) <u>वयोमर्यादाः-</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास उमेदवाराचे वय दि.18.12.2015 रोजी किमान 20 वर्षे असावे व कमाल 33 वर्षांपेक्षा जास्ती नसावे. (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत वय 38 वर्षे)

i) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या उमेदवारांबाबत – 58 वर्षे

ii) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा दलात सुरक्षा रक्षक / मुख्य सुरक्षा रक्षक / सुरक्षा जमादार या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता - 58 वर्षे

iii) सन 2003 मध्ये भरती परिपत्रक क्रमांक एसएफ/55/गोप/सीएसओ दि.08.12.2003 अन्वये प्रसारित केलेल्या भरती परिपत्रकानुसार झालेल्या भरतीप्रक्रीयेत निवड न झालेल्या उमेदवारांच्या बाबत – 58 वर्षे. सदर उमेदवारांनी भरतीप्रक्रीयेत अर्ज सादर केल्यास त्यांना इतर उमेदवारांप्रमाणे लेखी परिक्षा, शारिरीक व मैदानी चाचण्या द्याव्या लागतील. सदर चाचण्यात पात्र झाल्यास गुणवत्तेनुसार त्यांची निवड करण्यात येईल.

**<u>(क) शारिरीक अर्हताः</u>**

| पुरुषांसाठी | महिलांसाठी |
|---|---|
| (i) उंची किमान 165 सेंमी.<br>(ii) छाती न फुगविता 81 सेंमी आणि फुगवून 86 सेंमी.<br>(iii) कमीत कमी वजन 50 कि.ग्रॅ. असावे<br>(iv) दृष्टी चष्म्याशिवाय सर्वसाधारण असावी.<br>(v) शारिरीक क्षमता तपासणीसाठी उमेदवाराला 800 मिटर्स अंतर 2.35 मिनीटांत धावणे (38 वर्षापुढील उमेदवाराला 800 मिटर्स अंतर 2.45 मिनीटांत धावणे) किमान 5 पुलअप्स काढणे व किमान 10 फुट दोर चढणे व 3.25 मिटर्स लांब उडी मारणे आवश्यक आहे. | (i) उंची किमान 160 सेंमी<br>(ii) कमीत कमी वजन 47 कि.ग्रॅ. असावे<br>(iii) दृष्टी चष्म्याशिवाय सर्वसाधारण असावी.<br>(iv) शारिरीक क्षमता तपासणीसाठी उमेदवाराला 600 मिटर्स अंतर किमान 180 सेकंदात धावणे व 3 किग्रॅ वजनी गोळा किमान 2 मिटर्स फेकणे व किमान 5 सीट अप्स काढणे आणि किमान 1.75 मिटर्स लांब उडी मारणे आवश्यक आहे. |

2. पदाचे नाव/वर्ग - **सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण)** (ब वर्ग)

**एकूण पदे - 04**

(PB2 – रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4200)

| पदाचे नाव व वर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण) (ब वर्ग) | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 | 3 | 4 |

| समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण सामाजिक आरक्षण | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 | 2 | 3 |
| महिला (30%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 | 1 |
| **एकूण** | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 1 | 3 | 4 |

शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग आणि वि.मा.प्र.(अ) या प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणास न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने याबाबत न्यायालयाच्या प्राप्त होणाऱ्या अंतिम आदेशासापेक्ष आणि त्याअनुषंगाने शासनाच्या प्राप्त होणाऱ्या निदेशासापेक्ष सदर प्रवर्गासाठी आरक्षित करावयाची पदे खुल्या गटात समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

**(अ) शैक्षणिक व इतर आवश्यक अर्हता:**

(i) उमेदवार कला/विज्ञान/वाणिज्य/कायदा किंवा तत्सम या शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवीधर असावा.

(ii) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम परिक्षेत किंवा उच्चतम परिक्षेत 100 गुणांची प्रश्न पत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर किंवा निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण आवश्यक आहे.

(iii) सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण) या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे भारतीय सैन्यदलातील शारीरीक प्रशिक्षण, कवायत व शस्त्र प्रशिक्षण/ शस्त्र कवायत या विभागातील प्रशिक्षक (Instructor) म्हणून कमीत कमी 3 (तीन) वर्षाचा अनुभव असावा. तसेच उमेदवारांनी भारतीय सैन्य दलातील नायक हवालदार/नायब सुभेदार हे पद भुषविलेले असावे. भारतीय सैन्य दलातील रेजिमेंटल सेंटल या मधील प्रशिक्षक या पदावरील उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

*Note:* The rank specified at sr.iii above should not have been held in honourary capacity but in substantive capacity.

(iv) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा ''ओ'' स्तर किंवा ''ए'' स्तर किंवा ''बी'' स्तर किंवा ''सी'' स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणे/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्यांनी शासनाने विहीत केलेली एम.एस.सी.आय.टी.ची परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून 02 वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**(ब) वयोमर्यादा:** उमेदवाराचे वय दि.18.12.2015 रोजी 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

**(क) शारीरीक पात्रता:** **उंची:** 165 सें.मी.
**छाती:** 81 से.मी. (न फुगविता); 86 से.मी.(फुगवून)
**वजन:** कमीत कमी 50 कि.ग्रॅम. असावे
**दृष्टी:** सर्वसाधारण (चष्म्याशिवाय निकोप) असावी.

**उमेदवाराने शारिरीक मोजमापे व मैदानी चाचण्या, लेखी व मौखिक परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

**निवडीचे निकष व कार्यपध्दती:-**

**सहाय्यक सुरक्षा अधिकारी** व **सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण)** या पदांसाठी विहीत केलेली अर्हता, अटी धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची 200 गुणांची 02.00 तासाची वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची परिक्षा संगणकावर घेण्यात येईल. सदर 200 गुणांची विगतवारी खाली नमूद केल्यानुसार आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | सामान्य ज्ञान | 40 गुण |
| 2. | इंग्रजी | 40 गुण |
| 3. | स्वाभाविक कल (Aptitude Test) | 40 गुण |
| 4. | संगणकीय ज्ञान | 40 गुण |
| 5. | तर्कशक्ती (Reasoning) | 40 गुण |

लेखी परिक्षेमध्ये उपरोक्त नमूद प्रत्येक चाचणीत कमीत कमी 40% गुण व एकूण 50% गुण उमेदवाराने प्राप्त करणे आवश्यक आहे. लेखी परिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या शारीरिक व मैदानी चाचण्या घेण्यात येतील. सदर चाचण्यांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची 20 गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येईल. उमेदवाराने मौखिक परीक्षेमध्ये किमान 50% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. मैदानी परिक्षेचे गुण अधिक लेखी परिक्षेचे गुण अधिक मौखिक परीक्षेचे गुण एकत्रित करुन उमेदवाराची गुणवत्ता निश्चित करुन सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचा विचार करुन निवडयादी तयार करण्यात येईल. **तथापि, या प्रमाणे दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवाराच्या मैदानी चाचणीतील गुणांच्या गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल. तरीही दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण झाल्यास धावणे या मैदानी चाचणीतील गुणांच्या गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल. तरीही समान गुण झाल्यास उमेदवाराच्या जन्म दिनांकानुसार वयोजेष्ठतेने प्राधान्यक्रम देण्यात येईल.**

निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त असलेल्या पदांच्या उपलब्धतेनुसार वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल. वैद्यकीय तपासणीत पात्र झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई सुरक्षा दलाच्या प्रशिक्षण केंद्रावर चार महिन्यांचे प्रशिक्षण (तीन महिन्यांचे निवासी व एक महिन्याचे अनिवासी प्रशिक्षण) देण्यात येईल. तीन महिन्यांच्या निवासी प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारास दरमहा रु.3,000/- पाठ्यवेतन व एक महिन्याच्या अनिवासी प्रशिक्षणा दरम्यान (महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष

कामकाजाचे (Practical) प्रशिक्षण) रु.6000/- एवढे पाठ्यवेतन देण्यात येईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची सदर पदासाठी निवड झाल्यास तो ज्या खात्यात कार्यरत होता त्या खात्यामार्फत प्रशिक्षण कालावधीसाठी त्याचे वेतन काढण्यात येईल.

**<u>सहाय्यक सुरक्षा अधिकारी व सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण) या पदासाठी पुरुष उमेदवारांसाठी मैदानी चाचण्या-</u>**

1) **<u>800 मिटर्स धावणे</u>**

| वेळ | गुण |
|---|---|
| 2.35 मिनिटांपेक्षा जास्त वेळ | अपात्र |
| 2.35 मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी परंतू 2.30 मिनिटांपेक्षा जास्त | 12 |
| 2.30 मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी परंतू 2.25 मिनिटांपेक्षा जास्त | 15 |
| 2.25 मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी परंतू 2.20 मिनिटांपेक्षा जास्त | 18 |
| 2.20 मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी परंतू 2.15 मिनिटांपेक्षा जास्त | 21 |
| 2.15 मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | 25 |

2) **<u>पुलअप्स काढणे:-</u>**

| पुलअप्स | गुण |
|---|---|
| 5 पुलअप्स पेक्षा कमी | अपात्र |
| 5 पुलअप्स | 10 |
| 6 पुलअप्स | 11 |
| 7 पुलअप्स | 12 |
| 8 पुलअप्स | 13 |
| 9 पुलअप्स | 14 |
| 10 पुलअप्स | 16 |
| 11 पुलअप्स | 18 |
| 12 पुलअप्स | 20 |
| 13 पुलअप्स | 22 |
| 14 पुलअप्स किंवा जास्त | 25 |

3) **<u>दोर चढणे:-</u>**

| उंची (फूट) | गुण |
|---|---|
| 10 फूटापेक्षा कमी | अपात्र |
| 10 फूट | 14 |
| 11 फूट | 16 |
| 12 फूट | 18 |
| 13 फूट | 20 |
| 14 फूट | 22 |
| 15 फूट | 25 |

**4) <u>लांब उडी:-</u>**

| उडी (मीटर्स) | गुण |
|---|---|
| 3.25 मीटर्स पेक्षा कमी | अपात्र |
| 3.25 पेक्षा जास्त परंतू 3.50 पेक्षा कमी | 12 |
| 3.50 पेक्षा जास्त परंतू 3.75 पेक्षा कमी | 14 |
| 3.75 पेक्षा जास्त परंतू 4.00 पेक्षा कमी | 16 |
| 4.00 पेक्षा जास्त परंतू 4.25 पेक्षा कमी | 19 |
| 4.25 पेक्षा जास्त परंतू 4.50 पेक्षा कमी | 22 |
| 4.50 पेक्षा जास्त | 25 |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलीकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास बाद करण्यात येईल.

**<u>"सहाय्यक सुरक्षा अधिकारी" व "सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण)" या पदासाठी "महिला" उमेदवारांसाठी मैदानी चाचण्या -</u>**

**1) <u>600 मिटर्स धावणे</u>**

| वेळ | गुण |
|---|---|
| 180 सेकंदापेक्षा जास्त | अपात्र |
| 180 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 170 सेकंदापेक्षा जास्त | 10 |
| 170 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 160 सेकंदापेक्षा जास्त | 12 |
| 160 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 150 सेकंदापेक्षा जास्त | 14 |
| 150 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 140 सेकंदापेक्षा जास्त | 16 |
| 140 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 130 सेकंदापेक्षा जास्त | 18 |
| 130 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 120 सेकंदापेक्षा जास्त | 20 |
| 120 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी परंतू 110 सेकंदापेक्षा जास्त | 22 |
| 110 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 25 |

**2) <u>3 किग्रॅ वजनी गोळा फेकणे:-</u>**

| अंतर | गुण |
|---|---|
| 2.00 मिटर्सपेक्षा कमी | अपात्र |
| 2.00 मिटर्सपेक्षा जास्त परंतू 2.50 पेक्षा कमी | 12 |
| 2.50 मिटर्सपेक्षा जास्त परंतू 3.00 मिटर्सपेक्षा कमी | 14 |
| 3.00 मिटर्सपेक्षा जास्त परंतू 3.50 मिटर्सपेक्षा कमी | 16 |
| 3.50 मिटर्सपेक्षा जास्त परंतू 4.00 मिटर्सपेक्षा कमी | 19 |
| 4.00 मिटर्सपेक्षा जास्त परंतू 4.50 मिटर्सपेक्षा कमी | 22 |
| 4.50 मिटर्सपेक्षा जास्त | 25 |

गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल. त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत. गोळा फेकीत फेकलेला गोळा

जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

3) <u>सीटअप्स काढणे:-</u>

| सीटअप्स | गुण |
|---|---|
| 5 सीटअप्स पेक्षा कमी | अपात्र |
| 5 सीटअप्स | 6 |
| 6 सीटअप्स | 8 |
| 7 सीटअप्स | 10 |
| 8 सीटअप्स | 12 |
| 9 सीटअप्स | 14 |
| 10 सीटअप्स | 16 |
| 11 सीटअप्स | 18 |
| 12 सीटअप्स | 20 |
| 13 सीटअप्स | 22 |
| 14 सीटअप्स | 25 |

4) <u>लांबउडी मारणे:-</u>

| अंतर | गुण |
|---|---|
| 1.75 मिटर्स पेक्षा कमी | अपात्र |
| 1.75 मिटर्स पेक्षा जास्त परंतू 2.00 मिटर्सपेक्षा कमी | 12 |
| 2.00 मिटर्स पेक्षा जास्त परंतू 2.25 मिटर्सपेक्षा कमी | 14 |
| 2.25 मिटर्स पेक्षा जास्त परंतू 2.50 मिटर्सपेक्षा कमी | 16 |
| 2.50 मिटर्स पेक्षा जास्त परंतू 2.75 मिटर्सपेक्षा कमी | 19 |
| 2.75 मिटर्स पेक्षा जास्त परंतू 3.00 मिटर्सपेक्षा कमी | 22 |
| 3.00 मिटर्सपेक्षा जास्त | 25 |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलीकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास बाद करण्यात येईल.

**मैदानी चाचण्यांदरम्यान उमेदवार ज्या चाचणीमध्ये अनुत्तीर्ण होईल त्याच टप्प्यावर सदर उमेदवार भरती प्रक्रियेमधून बाद होईल. त्याला पुढील चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही.**

<u>ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची पध्दत -</u>

1. 'सहाय्यक सुरक्षा अधिकारी' व 'सहाय्यक सुरक्षा अधिकारी (प्रशिक्षण)' या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि.27.11.2015 ते दि.18.12.2015 रोजी पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. ऑनलाईन अर्ज दि.18.12.2015 पर्यंतच स्विकारण्यात येतील.
2. उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन

अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार रहाणार नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडीवर ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तींसोबत देवाण-घेवाण करु नये. <u>एखाद्या उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.</u>

4. ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणाऱ्या ई-पावतीची (Tramsaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करुन (printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन परीक्षेच्या वेळी सदर ई-पावतीची छायाकितप्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.
5. ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता "Click here for new Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती व ई-मेल आयडी नमूद करावा. त्यानंतर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्क्रीनवर दिसेल. उमेदवाराने सदर तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड स्वत:कडे लिहून ठेवावा. तात्पुरता रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येईल. उमेदवाराला अर्जात काही दुरुस्ती करावयाची असल्यास तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डचा उपयोग करुन दुरुस्त्या करता येतील.
6. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज पूर्णपणे भरु शकला नाही तर भरलेली माहिती "SAVE AND NEXT" या टॅबचा वापर करुन SAVE करता येईल. ऑनलाईन अर्ज SUBMIT करण्यापूर्वी उमेदवाराने "SAVE AND NEXT" या सुविधेचा वापर करुन भरलेली माहिती तपासून पहावी व आवश्यकतेनुसार त्यामध्ये दुरुस्ती करावी. अंतिम SUBMIT करण्यापूर्वी सर्व माहिती योग्य रितीने भरली असल्याची खात्री करुन घ्यावी.
7. उमेदवाराने स्वत:चे/वडिलांचे/पतीचे नाव तसेच नावांचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे. सदरची माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
8. उमेदवाराने भरलेली माहिती तपासण्यासाठी व SAVE करण्यासाठी "Validate your details" आणि "SAVE AND NEXT" या बटनांचा वापर करावा.
9. ऑनलाईन अर्ज अंतिम SUBMIT करण्यापूर्वी "Preview" टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा.
10. आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्यरितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "FINAL SUBMIT" बटनवर क्लिक करावे.
11. "Payment" बटनावर क्लिक करुन परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.
12. त्यानंतर "SUBMIT" बटनावर क्लिक करावे.
13. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतरच "SUBMIT" बटन प्रेस करावे. एकदा "SUBMIT" बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
14. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तद्नंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
15. उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

16. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका जबाबदार रहाणार नाही.

17. उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाल्यानंतर त्याच्या ई-मेल आयडी/भ्रमणध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल किंवा एमएमएसद्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पध्दतीने रजिस्टर्ड झाला नाही असे समजावे.

18. अपूर्ण अर्ज उदा.छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येतील.

19. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.

20. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर/उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.

21. उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

22. रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपर्ण अर्जाची मुद्रण करुन (PRINTOUT) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास बृहन्मुंबई महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

## <u>ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत</u>

1. ऑनलाईन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
   परीक्षा शुल्क: रु.600/- (सदर शुल्क हे खुल्या प्रवर्गातील/मागासवर्गीय व खात्यातंर्गत उमेदवारांसाठी लागू आहे).
2. परीक्षा शुल्क इंटरनेट बँकीग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबिट कार्ड (Rupay/Visa/Master card/Maestro) किंवा IMPS किंवा कॅश कार्ड्स किंवा Mobile Wallets व्दारे भरता येईल.
3. ऑनलाईन परीक्षा शुल्काचे Submission केल्यानंतर थोडा वेळ वाट पाहणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत Back किंवा Refresh बटन दाबु नये.
4. ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.
5. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास (Payment Failure) तात्पुरत्या रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्डच्या आधारे पुन्हा लॉगीन करावे लागेल. उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा यशस्वी न झाल्यास your online Transaction was unsuccessful please register again असा संदेश दिसेल. अशा वेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉगीन करणे आवश्यक आहे.
6. नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती (E-Receipt) मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची मुद्रण करुन (printout) काढुन ठेवणे आवश्यक आहे. ई-पावती उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेच्यावेळी प्रवेशपत्रासोबत सादर करावी.
7. Credit Card द्वारे परीक्षा शुल्क भरताना भारतीय चलनाचीच नोंद करावी.
8. आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.
9. उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

## <u>छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना</u>

<u>**छायाचित्र:-**</u>

1. उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.

2. सदरचे छायाचित्र फीकट, रंगीत किंवा पांढऱ्या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.
3. कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.
4. चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.
5. छायाचित्र 200x230 pixels एवढे असावे व त्याचा आकार 20kb ते 50kb इतका असावा. स्कॅन केलेले छायाचित्र हे 50kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

**स्वाक्षरी:-**

1. उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढऱ्या कागदावर स्वाक्षरी करावी.
2. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.
3. अर्जासोबत अपलोड केलेले स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
4. स्वाक्षरीचा आकार 10kb ते 20kb व त्याचे Dimensions 140x160 pixels एवढे असावे. स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही 20kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

**छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याची पध्दत.**

1. छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. त्यासाठी स्कॅनरचे Resolution हे 200 डीपीआय (Dots per inch) एवढे असावे.
2. कलर हा True colour व फाईलची साईज ही उपरोक्त प्रमाणे सेट करण्यात यावी.
3. उपरोक्त छायाचित्र व स्वाक्षरीबाबत दिलेल्या सूचनेनुसार छायाचित्र असणे आवश्यक आहे. त्याची फाईल ही JPG OR JPEG Format मध्ये असावी.
4. जर मुद्दा क्र.3 नुसार छायाचित्र व स्वाक्षरी नसेल तर स्क्रीनवर Error Message दिसेल.

**छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पध्दत.**

1. छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र/स्वाक्षरी असलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.
2. उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पद्धत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही, याची नोंद घ्यावी.
3. उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना**

**परीक्षा केंद्र- मुंबई/नवी मुंबई/ ठाणे/ पनवेल**

1. परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.
2. परीक्षेचे केंद्र / स्थळ / दिनांक / वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.
3. बृहन्मुंबई महानगरपालिका कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढवणे यांचे अधिकार राखून ठेवत आहे.
4. बृहन्मुंबई महानगरपालिका, उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.

5. उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या / तिच्या स्वत:च्या जबाबदारी व स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

<u>प्रवेशपत्र डाऊनलोड करणे</u>

ऑनलाईन परिक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिता उमेदवारांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वेबसाईटवर भेट द्यावी. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने संबंधित Link वर Click केल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिताची window स्क्रीनवर दिसेल. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिता उमेदवाराने रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड/जन्मतारखेचा वापर करावा. <u>उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.</u>

<u>ओळख पटवणे</u>

i) परीक्षा केंद्र प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / फोटोसहित आधारकार्ड / बँकेचे फोटोसहितचे पासबुक / महाविद्यालयाचे / विद्यापिठाचे अलिकडील वैध ओळखपत्र / कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहित असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक / पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

टिप:- उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहतांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. **रेशन कार्ड व ई-Aadhar कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्विकारले जाणार नाही.**

सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

1. परीक्षेसाठीचे वैध
2. मुळ फोटो ओळखपत्र
3. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

ii) परीक्षेला उशिरा येण्याबाबत:- परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास असली तरी उमेदवारास ओळख पटवणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परीक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण चार तास परीक्षा स्थळावर उपस्थित राहावे लागेल.

निवड प्रक्रियेदरम्यान गैरवर्तणूक/अनुचित प्रकार/गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करावयाची कार्यवाही:-

उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती/तपशील देऊ नये, खोटी माहिती तथा खोटा तपशील तयार करुन सादर करु नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेऊ नये.

परीक्षेच्या वेळात किंवा एकूणच निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवार,

१. अनुचित प्रकार करणे किंवा

२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा

३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे उध्दृत करणे, पाठवणे, साठवणे किंवा करणे किंवा

४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा

५. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा

६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे.

अशा कृत्यामध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास गुन्हेगारी कार्यवाहीस सामोरे जाण्यासह सदर उमेदवारास

१. तो ज्या परीक्षेला बसणार आहे त्या परीक्षेसाठी त्या उमेदवाराला अपात्र ठरविले जाईल.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येणा-या वेगवेगळया परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

३. जर उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**इतर महत्त्वाच्या सूचना-**

1. **परीक्षा घेताना काही अडचणी उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामुळे परीक्षा देण्यावर आणि/किंवा परीक्षेचा निकाल तयार होण्यावर परिणाम होऊ शकेल. अशा प्रसंगी उमेदवारांना परीक्षेसाठी इतर केंद्रावर हलविणे किंवा परीक्षा घेणे यासारखे आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील. ज्या उमेदवारांना अशा प्रकारचा बदल मंजूर नसेल त्या उमेदवारांची उमेदवारी या परीक्षेपुरती रद्द करण्यात येईल.**

2. **या भरती प्रक्रियेअंतर्गत उद्भवणा-य सर्व बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुकत यांचा निर्णय अंतिम असेल व तो उमेदवारांना बंधनकारक असेल. यासंबंधात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा व्यक्तिगत विचारणांना उत्तर दिले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

3. **एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळया सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.**

4. **पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.**

5. **शासनाने विविध शासन निर्णयानुसार वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविधा सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रक्रियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.**

6. **निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.**

7. **उमेदवाराने सदर पदाच्या अर्हता/अटींनुसार तो सदर पदासाठी पात्र असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.**

8. **सदर नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड याचा उपयोग करुन उमेदवाराला भरलेल्या अर्जाची प्रत** (Point Out ) Online **प्राप्त करता येईल. सदर अर्ज उमेदवाराने स्वत:तजवळ ठेवावा. पोस्टाने किंवा कुरिअरने पाठवू नये. परीक्षेअंती निवड झालेल्या उमेदवारांनीसदर अर्ज, त्यावर स्वत:चा पासपोर्ट आकाराचा अलिकडे काढलेला फोटो चिकटवून अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी, सर्वसाधारण अटी क्र.6 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह, नियुक्तीपूर्व सादर करणे आवश्यक आहे.**

9. **परीक्षेचे विहीत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने ताबडतोब ऑन-लाईन अर्ज सादर करावा. शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने अर्ज केला नाही तर शुल्क परत देण्याबाबतची उमेदवाराची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.**

10. **इतर कोणत्याही पध्दतीने उदाहरणार्थ पोस्टाने/कुरिअरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेण्यात येणार नाहीत.**

11. **अर्जानुसार पात्र असलेल्या उमेदवारांना परीक्षेसाठी प्रवेश पत्र पोस्टाने किंवा कुरिअरने पाठविण्यात येणार नाही. उमेदवाराने नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे आणि त्याची प्रत** (Print out) **काढावी.**

12. **उमेदवाराने प्रवेश पत्रावर स्वतःचे अलिकडे काढलेले रंगीत छायाचित्र चिकटविणे आणि परीक्षेच्या वेळेस ते सादर करणे आवश्यक आहे.**

13. **ऑन-लाईन परीक्षा बृहन्मुंबईमध्ये/ठाणे जिल्ह्यात घेण्यात येईल. तथापि, आवश्यकतेप्रमाणे परीक्षा स्थळांमध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहतील.**

14. **उमेदवारांना परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.**

15. **परीक्षेच्या वेही परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.**

<u>Online **नोंदणी व परीक्षेबाबतचे वेळापत्रक**</u>

| | |
|---|---|
| **ऑन-लाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **: दि.27.11.2015 ते दि.18.12.2015** |
| **नेट बँकीगव्दारे अर्ज शुल्क जमा करण्याचा कालावधी** | **: दि.27.11.2015 ते दि.18.12.2015** |
| **ऑन-लाईन परीक्षा** | **:** |

**(वरील दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना राहतील.)**

उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

ऑनलाईन परीक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर, उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड केली जाईल.

उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही, याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रीया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

तसेच ऑनलाईन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यापूर्वी त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन घेण्यात येईल. त्यावेळेस त्यांनी सादर केलेल्या अर्जाची प्रींटआऊट शासकीय सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन छायाचित्राच्या तीन प्रतींसह सादर करावीत. शारिरिक व मैदानी चाचण्यांबाबतचे वेळापत्रक व सूचना तसेच मौखिक परीक्षेचे वेळापत्रक http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

<u>**सर्वसाधारण अटी:-**</u>

1. निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
2. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने / तिने

त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र, अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

3. उमेदवाराचा ई-मेल आयडी (email ID)आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
4. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
5. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थालांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
6. खेळाडूंनी शासन निर्णय क्र.राक्रिधो-2002/प्रक्र 68/क्रीयुसे/2 दि.30.04.2005 क्रीडाविषयक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल. ते प्रमाणपत्र विधिग्राहय नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
7. उमेदवाराने खालील नमूद केलेल्या शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

   a) उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र, व्यावसायिक अर्हता (एन.सी.सी. बी किंवा सी प्रमाणपत्र,एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र), संबंधित गुणपत्रिका, सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जाती प्रमाणपत्र असल्यास, जाती वैधतेचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र यांच्या मूळप्रती व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.
   b) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करुन शकतात.
   c) महिला आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या अ.जा. / अ.ज. प्रवर्ग वगळता खुल्या वर्गासहित अन्य सर्व मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा विचार करण्यात येणार नाही.
   खुल्या वर्गातील महिला व अन्य समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित समांतर आरक्षणाच्या दृष्टीकोनातून शासकीय निदेशांनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित छायांकित प्रती नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.
   d) महिला आरक्षणांतर्गत एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधूनच भरण्यात येतील.
   e) उमेदवार इतरत्र नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे आवश्यक आहे.
   f) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड इ. सोबत बाळगणे आवश्यक आहे.

8. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशिल देणे आवश्यक आहे.
9. निवड झालेल्या उमेदवारांना चार महिन्यांचे निवासी प्रशिक्षण (तीन महिन्यांचे निवासी प्रशिक्षण व एक महिन्यांचे प्रशिक्षण) घ्यावे लागेल. सदर प्रशिक्षणादरम्यान त्यांना नियमानुसार निवासी प्रशिक्षणासाठी रु.3000/- प्रतिमहिना व अनिवासी प्रशिक्षणासाठी रु.6000/- प्रतिमहिना पाठयवेतन देण्यात येईल. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या कार्य क्षेत्रातील कोणत्याही सुरक्षा परिमंडळामध्ये नियुक्त करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.
10. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम,1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम,1999 लागू होतील.

11. निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1(एक) महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र सादर करावे लागेल.

12.निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम 1953) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

13.सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

14.वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय आहे.

15.महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक बीसीसी/2011/प्रक 1064/2011/16 ब दि. 12-12-2011 नुसार मागासवर्गीय उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 06 महिन्यांच्या आत आपल्या जात / जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे. परंतु जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

16.शासन परिपत्रक क्र.याचिका-3013/प्र.क्र.120 नवि-22 मंत्रालय दि.19.11.2014 मध्ये दिलेल्या निदेशांनुसार निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पोलीस स्टेशनकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

17.उमेदवारांना परिक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

18.उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवाशी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहिल. परंतु शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

19.शासन अधिसूनचा दि. 28-03-2005 व त्याअनुषंगाने शासन परिपत्रक दि. 01-07-2005 लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे. (अविवाहीत अर्जदारानेसुध्दा सदरचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये त्याने / तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा.)

20.प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरतीप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविणयाचे अधिकार माननीय महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

21.निवडसमितीने तयार केलेली निवड सूची 01 वर्षासाठी किंवा नवीन भरतीप्रकियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

22.काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परिक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

23.उमेदवाराने या भरतीप्रकियेसंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रकिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

24.निवड प्रक्रीयेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

25. खेळाडूंसाठी 5 टक्के आरक्षित पदे शासन निदेशातील अटी व शर्ती विचारात घेऊन भरण्यात येतील.

26. विजा(अ), भज (ब), भज (क), भज(ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्याऱ्या उमेदवारांकडे नवीनतम/अद्ययावत नॉन क्रिमिलअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

**<u>विशेष सूचना:-</u>**

1) यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

2) जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

3) मध्यस्थ / ठक / मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.

4) सेवायोजन कार्यालय / प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज सादर करावा.

5) सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

सही/-

उप आयुक्त (मध्यवर्ती भरती प्राधिकरण)